८२

विभागीय आयुक्त औरंगाबाद यांजकडून

जिल्हा लातूर.

## महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ अन्वये कलम ११ (१) ची अधिसूचना :-

(१) क्रमांक २००४/पुनर्वसन/कक्ष-१/सीआर-५९.---महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम ११ च्या पोटकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद असे जाहिर करतो की, महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तिंचे पुनर्वसन १९९९ च्या अधिनियमातील तरतुदी या द्वारे लातूर जिल्ह्याच्या देवणी तालुक्यातील आनंदवाडी साठवण तलावास उक्त अधिनियमाच्या कलम (१) खंड (अ) व खंड (ब) च्या तरतुदींच्या अनुरोधाने उक्त अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील. त्या प्रकल्पाच्या संबंधात या व्दारे.....

(अ) उक्त प्रकल्पाच्या बाधीत किंवा लाभधारक परीमंडळामध्ये येण्याची शक्यता आहे अशी गावे खालील प्रमाणे विनिर्दीष्ट करीत आहे..

(एक) बाधित परिमंडळात येण्याचा संभव असणारी गावे...

| अ. क्र. | गावाचे नाव | तालुक्याचे नाव | जिल्ह्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | आनंदवाडी | देवणी | लातूर |

(गावठाण अंशतः व शेत जमीन)

(दोन) लाभधारक परिमंडळात येण्याचा संभव असलेली गावे..

| अ. क्र. | गावाचे नाव | तालुक्याचे नाव | जिल्ह्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | आनंदवाडी | देवणी | लातूर |

(२) विभागीय आयुक्त असाही निर्देश देत आहे की, ही अधिसूचना संबंधीत गावामध्ये दवंडी पिटवून बाधित किंवा लाभ मिळालेल्या परिमंडळातील एखाद्या किंवा अनेक ठळक जागी गावांच्या चावडीवर आणि कोणतेही ग्रामपंचायत असल्यास ग्रामपंचायतीच्या कार्यालयात तसेच जिल्हाधिकारी, तहसीलदार, प्रकल्प अधिकारी व आयुक्त कार्यालयात देखील ठळक जागेवर किंवा जागांवर या अधिसुचनेची प्रत चिकटवून लातूर जिल्हाधिका-यांकडून सदर अधिसुचना प्रसिध्द करण्यात येईल.

के. बी. भोगे,
विभागीय आयुक्त, औरंगाबाद.

औरंगाबाद, २८ जुलै २००४.

---

८३

जिल्हा – लातूर

क्रमांक २००२/ ससाका/१/एलएनक्यू/सीआर/१३९ ज्याअर्थी भूमी संपदान अधिकारी, उप–विभागीय अधिकारी, उदगीर यांनी त्यांची अधिसूचना क्रमांक ४/२००२, दिनांक १८–३–२००४ याव्दारे असे अधिसूचित केले होते की, सोबतच्या अनुसूचिमध्ये जिचा तपशील नमूद करण्यात आला आहे अशी जमीन (यात यापुढे जीचा निर्देश ''उक्त जमीन'' असा करण्यात आला आहे) उक्त अनुसूचिमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जींचा निर्देश ''उक्त सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक होत्या किंवा आवश्यक असण्याचा संभव होता.

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) (यात यापुढे जीचा निर्देश ''संपादन अधिनियम'' असा करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना त्याच्या कलम ५–अ, पोट कलम (२) अन्वये अहवाल पाठविण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांचा अहवाल विचारात घेतल्यानंतर, अपर आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांची अशी खात्री झालेली आहे की, उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी महाराष्ट्र शासनाचे खर्चाने संपादन करण्याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी, आता, संपादन अधिनियमाच्या कलम ६ च्या उपबंधान्वये, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत. उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व कार्यवाहीच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांची कामे पार पाडण्याकरिता संपादन अधिनियमाच्या कलम ३, खंड (ग) अन्वये, याद्वारे विशेष भूमी संपादन अधिकारी, उप–विभागीय अधिकारी, उदगीर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे त्याला त्याने उक्त जमिनीच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही त्या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

उक्त जमीनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथा भूमी संपादन अधिकारी, उदगीर यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळात पाहण्याकरीता उपलब्ध आहे.

अनुसूची

जिल्हा लातूर, तालूका चाकूर, गाव चाकूर

| गट. नं. | आवश्यक जमीनीचे अदमासे क्षेत्र हे. आर. |
|---|---|
| १ | २ |
| २८८/१/१ | ३.०० |
| २८८/१/१ | १.२४ |
| २७१/१/१ | ०.०३ |
| २७० | ०.३० |
| २६९/१/२ | ०.२८ |
| २६९/१/१ | ०.१५ |
| | ५.०० |

ज्यासाठी जमीन आवश्यक आहे किंवा आवश्यक असण्याचा संभव आहे ते प्रयोजन –नवनिर्मित तहसील कार्यालय, चाकूर जमीन संदपान

अपर आयुक्त, औरंगाबाद

उदगीर, ७ जुलै २००४